# जिल्हा परिषद,गडचिरोली
## बांधकाम विभाग
### काम वाटप समितीमार्फत बांधकामे वाटपाकरीता जाहिर सुचना पत्र क्र. 18/2020-21

जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत बांधकाम विभागातील खालील कामाकरिता महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2010/275/प्र.क्र.172/पंरा-7 दिनांक 19 ऑक्टोबर, 2011 मधिल परिच्छेद क्रमांक 04 मधिल उपपरिच्छेद 5 मध्ये नमुद कार्यपद्धती नुसार तसेच ग्राम वि.व जलसंधारण विभाग शा. नि.क्र. झेडपीए-2015 / प्र.क्र. 10 /वित्त -9 दिनांक 25 मार्च 2015 नुसार जिल्ह्यातील इच्छुक ग्रामपंचायती यांचे कडुनच खालील नमुद कामांकरीता याव्दारे अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | मंजूर कामाचे नांव | तालुका | अंदाजित किमत / शेडुल रक्कम (लक्ष) | ग्रा.प.नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | **आमदार स्थानिक विकास कार्यक्रम 2020-21** | | | |
| 1 | मौजा- नवेगाव ग्रा.पं.मुरखळा येथे श्री.पेंदोर ते चंद्रपुर मुख्य रस्त्यापर्यंत रोड चे खडीकरण करणे ता.गडचिरोली | गडचिरोली | 5.00 | |
| 2 | मौजा-रायपुर ता.गडचिरोली येथे ग्राम सभा कार्यालयाच्या आवारात प्रसाधन गृहाचे बांधकाम करणे ता.गडचिरोली | गडचिरोली | 8.00 | |
| 3 | मौजा-नविन वघाळा (बर्डी) येथिल श्री.घनशाम ढोंगे ते श्री.त्र्यंबक राऊत यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता बांधकाम करणे ता.आरमोरी | आरमोरी | 2.99 | |
| 4 | मौजा-जुना वघाळा हनुमान मंदीर ते यशवंत दोनाडकर यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता बांधकाम करणे ता.आरमोरी | आरमोरी | 2.99 | |
| | **एकुण बेरीज** | | 18.98 | |

**वर नमुद कामांकरिता ग्रामपंचायती यांचेकडुन अर्ज मागवितांना संबधितास खालील सुचनांचे पालन करणे आवश्यक राहील.**

ग्रामपंचायतीनी कामाची मागणी करतांना खालीलप्रमाणे कागदपत्र विहित दिनांकापूर्वी सादर करणे आवश्यक राहील.

1) कामाचे मागणीपत्र सरपंच/सचिव यांचे संयुक्त स्वाक्षरीने ग्राम पंचायतीच्या ठरावासह
2) ग्रामपंचायतीच्या उत्पनाचे संवर्ग विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र सन 2020-21 (सक्षम प्राधिका-याकडुन सांक्षाकीत केलेले)
3) ग्रामपंचायतीचे नावाचे GST रजिस्टेशन प्रमाणपत्र (रेगुलर)
4) ग्रामपंचायतीचे नावाचे TAN/PAN प्रमाणपत्र (रेगुलर)
5) काम ग्रामपंचायतीच्या हद्दीत असल्याबाबत सरपंच/सचिव यांचे संयुक्त स्वाक्षरीचे गावठाण प्रमाणपत्र
6) ग्रामपंचायतीला कामाची मागणी करतांना वरिल प्रमाणपत्रासोबत रु. 10.00 लक्षापर्यंतच्या कामाला करारनामा करण्याकरिता रु.500 चे स्टॅम्प पेपर सादर करणे अनिवार्य राहील तसेच 10.00 लक्षाचे वरिल कामाला प्रत्येक लक्षाला 100 रु. प्रमाणे स्टॅम्प पेपरची आकारणी करावी लागेल.

7) दिनांक 19 ऑक्टोंबर 2011 च्या शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतीला आवंटीत केलेली कामे ग्रामपंचायत स्वत: मजुर लावून व साहित्य खरेदी करुन (डिपार्टमेंटल पध्दतीने ) काम करणार असल्यास e-Tendering माध्यमातुन काम देण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही. परंतु यासाठी जे साहित्य खरेदी करावयाचे आहे ते मात्र,रुपये 1,00,000/- (रुपये एक लक्ष ) पेक्षा जास्त किंमत असल्यास प्रत्येक बाब e-Tendering च्या माध्यमातुन निविदा मागवून खरेदी करण्यांत यावी. अशा तऱ्हेने साहीत्य खरेदी करतांना केवळ 1 लाखापेक्षा कमी किंमत व्हावी व केवळ e-Tendering च्या प्रक्रीयेतुन सुट मिळवण्यासाठी त्यांचे तुकडे करुन खरेदी करु नये. रु.3 लाखापेक्षा कमी किमतीची कामे ग्रामपंचायतीने प्रचलीत शासन नियम व निर्णयानुसार करावीत.
**रुपये तिन लाख व त्यापेक्षा अधिक मुल्याच्या सर्व कामासाठी तसेच रु.एक लाख व त्यापेक्षा अधिक किंमतीच्या साहीत्य खरेदीसाठी e-Tendering प्रणालीचा अवलंब करणार असल्याचे सरपंच/ सचिव, ग्रामपंचायत ------------------------यांचे रु.100/- चे स्टॅम्प पेपरवर संयुक्त स्वाक्षरीचे हमीपत्र/ शपथपत्र सादर करणे अनिवार्य आहे.**

8) **ग्रामपंचायतीकडे सुरु असलेल्या कामाची यादी प्रलंबित कामाची संख्या व सदर ग्रामपंचायतीस काम देण्यात यावे किंवा कसे याबाबत उप अभियंता (बांधकाम) --------------------जि.प.गडचिरोली यांचे कामा बाबत अभिप्राय प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.**

9) **वरिलप्रमाणे ग्रामपंचायतीचे मागणीसह इतर दस्ताऐवज सादर केल्याची निविदा शाखा बांधकाम विभाग जि.प.गडचिरोली यांचेकडुन पोहच घ्यावी.**

10) अट क्रमांक 1 ते 4 चे अधिन राहून ग्रामपंचायतीने मागणी केलेली कामे ग्रामपंचायतीकरीता आवंटीत करण्यात येतील.

11) शासन निर्णय क्र.संकीर्ण-2010/275/प्र.क्र.172/पंरा-7 दिनांक 19 ऑक्टोबर, 2011 मधिल परिच्छेद 4 नुसार विहीत कार्यपद्धतीनुसार काम वाटपाची कार्यवाही करण्यांत येईल.

12) ग्रामपंचायतीकरीता आरक्षीत केलेली कामे वगळुन उर्वरीत (ग्रामपंचायतीने मागणी न केलेले) कामाचे सुशिक्षीत बेरोजगार अभियंता, मजुर सहकारी संस्था व पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांचे मध्ये 33:33:34 या प्रमाणात कामे आरक्षीत करण्यात येतील व आरक्षीत करण्यात आलेल्या कामाची यादी मंजुरीनंतर www.mahatender.gov.in या वेबसाईटवर E-Tender 5.00 लक्षाचे वरिल व 3.00 लक्षाचे आतील कामे www.zpgadchiroli.org लॉटरी पध्दतीने या बेबसाईटवर वाटप करण्या करीता प्रकाशीत करण्यात येईल.

13) ग्रामपंचायतींनी रस्त्याची कामाची मागणी त्या कामासाठीची अवजारे किंवा यंत्रे असतील वा जर ग्रामपंचायती अशी अवजारे व यंत्रे भाडयाने घेऊ शकत असतील (तत्सबंधीचे प्रमाणपत्र जोडावे) त्यानुसार समिती योग्य तो निर्णय घेईल. डांबरीकरणाची तसेच इमारतीच्या वॉटर प्रुफींग व विद्युतीकरणाची कामे ग्रामपंचायतीस दिली जाणार नाही.

14) ज्या ग्रामपंचायती / सुशिक्षित बेरोजगार अभिंयता / मजुर सहकारी संस्था / कंत्राटदार (खुला) मुदतीत काम पूर्ण करणार नाहीत तसेच मुदतीत सुरु करणार नाहीत त्यांचेवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,गडचिरोली यांचे कार्या.आदेश क्र./जिपग/बांवि/सलेअ/दंड आकारणी/6137/2020 दिनांक 26.11.2020 नुसार दंडात्मक कार्यवाई करण्यांत येईल व दंडाची रक्कम देयकातुन वसुल करण्यांत येईल. दंडात्मक कार्यवाई टाळणेसाठी मुदतीत काम पूर्ण करणे यंत्रणेच्या हिताचे राहील.

15) ब-याच वेळेस जुन्या कामामधील किरकोळ कामे दिर्घ कालावधीसाठी प्रलंबीत राहतात व बांधकामाची उपयोगिता कमी होते यास्तव जुने बांधकामे पूर्ण झाल्याशिवाय नविन बांधकामाची देयके अदा केली जाणार नाही.

16) **पार पाडलेल्या कामाचे भुगतान अनुदानाचे उपलब्धतेनुसार करण्यांत येईल.निधी खर्च करण्याच्या कालावधीची मर्यादा संपल्यानंतर काम विलंबाने पुर्ण झाल्यास देय रक्कमेचे भुगतान करण्याची जबाबदारी विभागाची राहणार नाही.**